| MHPU240004872010 | कोंडीभाऊ वाळुंज<br>वि.<br>कृष्णा वाळुंज |
|---|---|

## निशाणी क्र.१०६ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी तर्फे 'पुरावा बंद' चा आदेश रद्द होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीने निशाणी १०८ वर लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी वादीला त्रास देण्यासाठी दाव्याचे कामकाज लांबवत आहे. अर्जातील कथनास पुरक असे कोणतेही कागदपत्र प्रतिवादीने न्यायालयात दिलेले नाही. त्यामुळे त्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. उभय पक्षकारांतर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे दिसुन येते की, निशाणी क्र. ५६ कडे मुद्दे काढण्यात आले आहेत. दिनांक ०६/०७/२०१९ रोजी वादीने निशाणी क्र. ७२ कडे पुरावा बंदची पुरसिस दाखल केलेली आहे. त्यानंतर प्रकरण प्रतिवादींच्या पुराव्याकामी नेमण्यात आले होते. परंतु, त्यांनी पुरावा न दिल्याने दिनांक १९/०६/२०२५ रोजी त्यांच्याविरुध्द 'पुरावा बंद' चा आदेश झालेला आहे. प्रस्तुतचा अर्ज दिनांक

२६/०६/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जात दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. परंतु, दावा वाटप व ठरावाकरीता असल्याने, न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी अर्ज कॉस्टस् बसवून मंजूर करणे उचित होते. या सर्व बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येतो–

अर्ज, रक्कम रुपये ५००/– वादीस कॉस्टस् अदा
करण्याच्या अटींवर मंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed
by PATIL
AVINASH
MADHUKAR
Date:
2025.11.27
15:53:15 +0530

**[अविनाश म. पाटील]**

दिनांक :२७/११/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gaurav A. Bobade. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 27/11/2025. |
| Corrected on | : 27/11/2025. |
| Signed on | : 27/11/2025. |